# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक २७/०६/२०२५

## नागपुर ग्रामीण पोलीसांनी सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये एन.डी. पी.एस कायदयाअंतर्गत केलेली अतुलनीय कामगिरी, जुन २०२५ पर्यंत एन.डी.पी.एस कायदयाअंतर्गत ३४० गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थांची तस्करी आणि वाढत्या सेवनाला आळा बसण्यासाठी संपूर्ण नागपूर ग्रामीण जिल्हयात मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कारवाई करण्यासाठी वेळोवेळी विशेष मोहीम राबविल्या गेल्या. विशेष मोहिमे अंतर्गत जिल्हास्तरावर स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण येथील अधिकारी आणि अंमलदार यांचे स्वतंत्र विशेष पथक **(एन.डी.पी.एस. सेल)** स्थापन करण्यात आले. तसेच नागपुर ग्रामीण जिहयातील सर्व प्रभारी यांना कडक कारवाई बाबत आदेशीत करण्यात आले. त्यांच्या पोलीस स्टेशन स्तरावर त्यांच्या हद्दीतील अंमली पदार्थाचा साठा, विक्री, वाहतुक करणारे आरोपीतांवर तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर कडक कारवाई करण्याकामी पोलीस स्टेशनला **(एन.डी.पी.एस. सेल)** स्थापन करण्यात आले. याचा परीणाम म्हणुन सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये अंमली पदार्थाचा साठा, विक्री ,वाहतुक आणि सेवन करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हे नोंद करून नागपुर ग्रामीण पोलीसांनी अतुलनीय कामगिरी केली आहे.

**एन.डी.पी.एस कायदया अंतर्गत सन २०२४ मध्ये ५२ गुन्हे दाखल असुन सन २०२५ मध्ये (आज पावेतो) ३४० गुन्हे दाखल आहे. सन २०२४ मध्ये आणि सन २०२५ (आज पावेतो) मध्ये संपुर्ण गुन्हे उघड आहे. तसेच पोलीसांनी एन.डी.पी.एस कायदयान्वये दाखल होणाऱ्या प्रत्येक प्रकरणात सखोल तपास करून अंमलीपदार्थ पुरवठा करणारे आणि विकणारे यांची साखळी जळवुन त्यांचा शोध घेतला आणि पुरवठा करणारे स्त्रोत शोधुन शेवटया साखळी पर्यत जावुन ओरीसा येथुन ४ आरोपीतांना अटक**

करण्यात आली तसेच मुंबई येथुन २ आरोपीतांना अटक केली आहे. नागपुर ग्रामीण जिल्हयात सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांवर सतत कारवाई करण्यात येत आहे.